MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

Garden Department

2nd. Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal.Dist.- Thane. 401107 Tel.No. 28103409

Ref.no/MBMC/Garden/1259/2026-27 **Date:-17/11/2026**

// TENDER NOTICE //

Mira Bhaindar Municipal Corporation Garden Department invites sealed tender form for following work in two envelope system at the day 25/11/2026 up to 1.00 pm. The tender form and other relevant document will be available for download on https://mahatenders.gov.in from the date 18/11/2026 to 25/11/2026 till 1.00 pm. The tender shall be opened in the presence of the bidders or their representatives on the day 27/11/2026 at 01.00 Pm at the tender cell of Mira Bhaindar Municipal Corporation.

Sr.no	Name of work	Estimate Cost	Earnest Money Deposit (EMD	Cost of tender documents
1.	Installation of open gym equipment and artificial Lawn at the P.T. Usha Women's Gym, located in Ward No. 02, Bhayandar (East), within the Mira-Bhayandar Municipal Corporation area. **(Ward Committee Fund)**	Rs.6,81,641/- (Rs . Six Lakh Eighty one Thousand Six Hundred Fourty one only)	Rs.6,816/- (Rs. Six Thousand Eight Hundred Sixteen only)	Rs. 500+90 (GST)= Rs.590/- (Rs. Five Hundred Ninety Only) Non Refundable

NOTE :-
1) Tender form should be submitted through Online System in two envelope
2) Tender form fee not refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhaindar Municipal Corporation has reserved Right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The Period of tender law admissibility is 120 days.

(Kavita Borkar)
Dy Commissioner (Garden)
Mira Bhaindar Municipal Corporation

मिरा भाईंदर महानगरपालिका

उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

जा.क्र.मनपा/उदयान/१२५९/२०२६-२७ **दिनांक :-१७/११/२०२६**

// जाहीर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान विभागामार्फत खालील कामांकरिता दोन लिफाफा पध्दतीने दि.२५/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची अटीशर्तीसह निविदा N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध् असुन सदर निविदा फॉर्म दि.१८/११/२०२६ पासुन ते दि.२५/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत (डाऊनलोड करुन) भरता येतील. मुदतीत आलेल्या निविदा दि.२७/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा सेल मिरा भाईंदर महानगरपालिका येथे उघडण्यात येतील.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च	निविदा बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फी
१	मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविणे. **(प्रभाग समिती निधी)**	रु.६,८१,६४१/- (रु. सहा लाख एक्याऐंशी हजार सहाशे एकेचाळीस मात्र)	रु.६,८१६/- (रु.सहा हजार आठशे सोळा मात्र)	रु.५००+ ९० (GST) = रु.५९०/- (रु. पाचशे नंवद मात्र) (ना- परतावा)

टिप :- १. निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
२. निविदा फॉर्म फि परत केली जाणार नाही.
३. आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकरण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे. त्याबददल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.
४. निविदा विधी ग्राहयता कालावधी १२० दिवसांचा असेल.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

// निविदा पत्रक //

सन २०२६-२७

निविदा क्र.---------- अनुक्रमांक----------

निविदा फॉर्मची किंमत रु. ---------- निविदा बयाणा रक्कम रु. ----------

निविदेचे नांव :- ----------

निविदाधारकाचे नाव श्री. / मे. ----------

पुर्ण पत्ता :- ----------

निविदा सुचना प्रसिध्दिची तारीख :- ---------- वृत्तपत्राचे नाव ----------

निविदा पत्रके विक्रीची मुदत ---------- वेळ --------

निविदा बयाणा स्विकारण्याची मुदत ---------- वेळ ----------

निविदा पत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख ---------- वेळ ----------

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

// निविदा दरसुची //

कामाचे नांव :- मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविणे. (प्रभाग समिती निधी)

निविदा भरणाऱ्याचे नाव व पत्ता :----------

व्यवसायाचे / संस्थेचे नाव व पत्ता :----------

निविदा बयाणा रक्कम रु. ---------- (अक्षरी रु.----------)

डि. डि. (धनाकर्ष क्र.) ---------- दिनांक ----------

बँकेचे नाव ----------

अ.क्र.	तपशिल	दर (सर्व करांसह)
1	**Pedal Push**	Rs._____ /- Per No.
2	**PCC- Per Sq. Mtr For Rubber Mat and Artificial Grass**	Rs._____ /- Per Sq. Mtr.
3	**Artificial Grass Without PCC**	Rs._____ /- Per Sq. Mtr.

निविदाधारकाची सही व शिक्का

MIRA BHAINDAR MUCIPAL CORPORATION

2nd Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal.Dist.-Thane. 401107 Tel.No. 28103409

Commerical Bid

Name Of Work – Installation of open gym equipment and artificial Lawn at the P.T. Usha Women's Gym, located in Ward No. 02, Bhayandar (East), within the Mira-Bhayandar Municipal Corporation area. (Ward Committee Fund).

Name Of Agency : ……

& Add. : ……

Agency's Owner Name : ……..

& Add. : ……..

…….

Sr.No	Description	Rates (including all taxes)
१	**Pedal Push**	Rs._____/- Per No.
२	**PCC- Per Sq. Mtr For Rubber Mat and Artificial Grass**	Rs._____/- Per Sq. Mtr.
३	**Artificial Grass Without PCC**	Rs._____/- Per Sq. Mtr.

Place :- ----------

Date :- ----------

Agency's Seal & Signature

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

निविदा पत्रकाविषयी नियम व अटीशर्ती सन २०२६ — २०२७

१) निविदा पत्रका संबधीची सविस्तर माहिती संबधित खात्यातुन विनामुल्य मिळेल.

२) निविदा पत्रक किंमत (Receipt online system) ऑनलाईन सिस्टीमव्दारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही. तसेच निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही.

३) निविदेसाठी EMD Receipt online system ऑनलाईन स्विकारण्यात येईल. चेकने किंवा रोख रक्कम स्विकरली जाणार नाही.

४) निविदा बयाणा / सुरक्षा अनामत वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकारले जाणार नाही.

५) निविदाधारकाने नेटवर डाऊनलोड केलेल्या निविदा पत्रकातच दर भरुन N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in वर सादर केले पाहिजे.

६) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.

७) निविदाधारकाने निविदा पत्रात मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविणेकामी दर प्रमाणक याची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात भरणे आवश्यक आहे.

८) निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

अ) लिफाफा क्र. १.मध्ये **(Envelop No. 1)**

१. निविदेची फी (Tender Form Fee) — रु.५०० + रु.९०/- (GST) = रु.५९०/-
२. बयाणा रक्कम — (Earnest Money Deposit) (EMD) — रु.६,८१६/-
३. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)
४. पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.)
५. **सरासरी वार्षिक उलाढाल :-**

निविदाकाराची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान ७५% असावी. याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.

६. The tenderer's should have satisfactorily executed similar nature of work in Govt./Semi Govt./ Urban Local Bodies only during last (5) years (01/04/2021 to bidd submission date). Bidder to do the work according to the category you have given for Supply and installation of artificial grass with Equipments. (Attach work order with completion certificate)(Rs.6,81,641/-)
   a) Three similar completed works (Only Supply and installation of artificial grass with Equipments) costing not less than amount equal to 40% (Fourty Percent) of the Tender cost. (Rs.2,72,656/-)

Or

b) Two similar completed works (Only Supply and installation of artificial grass with Equipments) costing not less than amount equal to 50% (Fifty Percent) of the Tender cost. (Rs.3,40,821/-)

Or

c) One similar completed works (Only Supply and installation of artificial grass with Equipments) costing not less than amount equal to 80% (Eighty Percent) of the Tender cost. (Rs.5,45,313/-)

७. निविदाधारकांची (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्स इत्यादी संबंधीत सस्थांनचे नोंदणी प्रमाणपत्र.

८. निविदाकाराला गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र.

९. निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

<u>ब) लिफाफा क्र. २.मध्ये</u> (Envelop No. 2)

१) निविदा पत्रक दरसुची अटी- शर्तीसह सादर करणे.

निविदापत्रक दरसुची संकेतस्थळावर Online उपलब्ध करुन देण्यात येईल त्यामध्येच दर भरावेत.

९. निविदाधारक यांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी वरील (अ) च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबींचा व (ब) चे लिफाफ्यात वित्तीय बाबींची कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी

१०. महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येईल. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र १ मधील कागदपत्रे पुरिपुर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. अन्यथा अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

११. सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशमध्ये नमुद केलेल्या मुदतीत पुर्ण करुन द्यावयाचे आहे.

१२. कोणतीही निविदा पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

१३. निविदाधारकाने करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तात्काळ ठरवून दिलेल्या मुदतीत काम करणे बंधनकारक राहील.

१४. निविदाधारकाने निविदा एकाच संगणकावरून भरलेले एकाच क्रमांकाचा IP Address आढळल्यास सदर निविदा धारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१५. महानगरपालिकेला आवश्यकता असल्यास कमी अधिक ठिकाणी व्यायामाचे साहित्य बसविणे निविदाधारकास बंधनकारक राहिल.

१६. मंजुर निविदाधारकांने सदरचे काम खंडित केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास किंवा संबंधित खात्याकडून तक्रार आल्यास मंजुर निविदाधारक म्हणजेच व्दितीय पक्षीय (L१) यांची अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन, सदरच्या कंपनीस काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच (L२) कडून सदर निगा व देखभालीचे काम करुन घेण्यात येईल व फरकापोटी असणारी रक्कम (L१) कडून विहित पध्दतीने वसूल करण्यात येईल यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

१७. सदर ठेकेदाराकडून निविदेच्या ०१ टक्का इसारा रक्कम व ०५ टक्के प्रदानाच्या देयकामधून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून कपात करण्यात येईल.

१८. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाकारांवर बंधनकारक राहील. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाकाराने संबंधित कार्यालयाकडून घेणे बंधनकारक राहील.

१९. महानगरपालिकेच्या आदेशांची अंमलबजावणी करावी लागेल. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महानगरपालिकेच्या हिता विरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामकाजात गोपनियता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार मुख्य उद्यान अधिक्षक व उप आयुक्त (उद्यान), मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

२०. मुदतीचे आत अभिकर्त्याचा ठेका मुदतपुर्व रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला असून यासाठी १५ दिवसांची पुर्वसुचना देणेत येईल.

२१. यशस्वी ठेकेदारास कोणत्याही टप्प्यावर करार रद्द करावयाचा असल्यास आगाऊ ०३ महिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहील.

२२. ठेकेदारा बरोबर केलेल्या कराराची मुदत कार्यादेश दिल्यापासून १ वर्ष कालावधी करीता राहील. आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ देणे अथवा मुदतपुर्व करार संपृष्टात आणणेबाबत महानगरपालिकेच्या निर्देशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२३. मंजूर निविदाधारकाने व्यायामाचे साहित्य व कृत्रिम लॉन पुरवठा करुन बसविल्यानंतर ०१ वर्षाच्या आत खराब झाल्यास दुरुस्ती करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच व्यायामाचे साहित्य यांना प्रत्येक तीन महिन्यांनी आईलींग व सर्व्हिसींग करणे ०१ वर्षा पर्यंत बंधणकारक राहील.

२४. सदरची निविदा मिळण्याकरीता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारक / यशस्वी निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवारी करण्यात येईल.

२५. निविदा मंजुर कंत्राटदार यांनी महानगरपालिकेबरोबर ठरवून दिलेल्या कामाचा कारारनामा नियमानुसार स्टॅम्प पेपरवर त्वरीत करुन द्यावा. तदनंतरच कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती संबधितावर बंधनकारक राहतील. सदर निविदा प्रपत्र करारनाम्याचा भाग असेल.

२६. यशस्वी ठेकेदार यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही. ठेकेदार यांनी फक्त दिलेल्या निर्देशानुसार व्यायामाचे साहित्य व कृत्रिम लॉन बसविणे.

२७. मंजुर निविदाधारकाकडुन नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य कर देयकातुन कापुन घेण्यात येतील.

२८. मंजूर निविदाधारकांनी केलेल्या कामाचे मागणी पत्र सादर केल्यानंतर त्यांचे देयक अदा करण्यात येईल.

२९. निष्काळजीपणा, अज्ञात, सहेतुक कार्यवाही अथवा ठेकेदाराशी संबंधित कारणाने महानगरपालिका मालमत्तेची हानी झाल्यास किंवा अन्य दोष राहिल्यास, कोणताही बोजा निर्माण झाल्यास उपलब्ध अभिलेखानुसार होणारी नुकसान भरपाई संबंधित ठेकेदार, व्यक्ती / संस्थांकडून देयकातुन / अनामत / सुरक्षा अनामत रक्कमामधून वा अन्य कायदेशीर मार्गाने वसुल केली जाईल. प्रसंगानुरुप अन्य कायदेशीर कार्यवाहीस संबंधित ठेकेदार व त्याचेकडील सेवा पुरवणाऱ्या व्यक्ती पात्र ठरतील.

३०. या कामी लेखापरिक्षणात काही आक्षेप आल्यास त्याची योग्य पूर्तता करण्याची जबाबदारी मंजुर अभिकर्त्यावर / कंत्राटदारावर राहील.

३१. सुरक्षा अनामत पोटी ठेकेदाराच्या देयकातून ५ टक्के इतकी रक्कम कपात करील. तसेच सदरची रक्कम बीनव्याजी असेल. ठेका संपल्यानंतर तीन महिन्यानंतर सदर रक्कमेच्या परताव्यासाठी मागणी करता येईल.

३२. या कंत्राटासंबंधी कोणताही वाद उत्पन्न झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

३३. निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास निविदा धारकास नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणेबाबत तात्काळ कळवण्यिात येईल. सात (७) दिवसाच्या आतमध्ये स्टॅम पेपर सादर केल्यानंतर करारनामा करुन कार्यादेश देण्यात येईल.

३४. निविदाधारकाने अंदाजपत्रक, करारनामा व कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे काम न केल्यास एकुण रक्कमेच्या ०.२५ टक्के रक्कम प्रती दिन याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

३५. निविदा धारकाने करारनामा लिहुन दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तात्काळ काम सुरु करणे बंधनकारक राहिल.

३६. ठेकेदाराने उपलब्ध केलेले मनुष्यबळ व इतर संसाधने या संबधीची देयके/ वेतन संबधितांना देण्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील. याबाबत महापालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

३७. safety requirements :- मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविते वेळी कोणत्याही व्यक्तीस अथवा / कर्मचा-यास /कामगारास कुठल्याही प्रकारची इजा , अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Loss of Life) त्याबाबतची सर्व खर्चाची व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

३८. Financial & legal liability:- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तिय व कायदेशीर प्रश्न् निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

३९. Subcontract:- मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविणे काम सबकॉन्ट्रक्टर / कंपनी / ठेकेदार / इतर व्यक्ती यांना देता येणार नाही.

४०. मिरा भाईंदर महानगरलिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) प्रभाग क्र.०२ मधील पी.टी. उषा महिला जीम येथे ओपन जीम साहित्य, कृत्रिम लॉन बसविणेकामी उभयपक्षीयांमध्ये काही वाद उपस्थित झाल्यास मा.न्यायालयाकडे दाद मागता येईल. मा.न्यायालयाचे क्षेत्र जिल्हा ठाणे असेल याची नोंद घेण्यात यावी.

४१. निविदाधारकाची निविदा नामंजुर झाल्यास त्याच्या EMD परत मिळविण्यासाठी मुळ पावतीसह अर्ज केल्यास त्वरीत परत करण्यात येतील. सदर EMD वर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही.

४२. निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेतील नियम व अटी मान्य असल्याबददल त्यावर शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

(कविता बोरकर)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
मा. उप-आयुक्त सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प).

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असुन त्या संबधीची सर्व माहिती समजावुन घेतली आहे. निविदेसंबधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

वरील निविदांचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक व मान्य आहेत.

दिनांक :-

निविदाधारकाची सही

शिक्का :-

नाव :- _____

_____

पत्ता :- _____

_____

_____